जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
7 SEP 1988


(23)

सेवाप्रवेश नियम
पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात/सेवेत/श्रेणीत किमान सेवेसंबंधीची अट विहित करणे.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०८८/१०९/बारा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २५ ऑगस्ट १९८८.

पहा :- १] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१२७७/१२, दिनांक १४ ऑक्टोबर १९७७.
२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१२७७/१२, दिनांक ३ सप्टेंबर १९७९.
३] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१०८०/१२, दिनांक २० जुलै १९८१.

परिपत्रक :-

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०८०/१२, दिनांक २० जुलै, १९८१ व्दारे पदोन्नती करताना निम्न संवर्गात ३ वर्षाच्या किमान सेवेची अट विहित करण्यात आलेली आहे. तथापि ही अट आंतरश्रेणी पदोन्नतीच्या बाबतीत लागू नाही. आंतरश्रेणी पदोन्नतीच्या बाबतीत सुध्दा निम्न पदावर किमान सेवेची अट लागू करता येईल किंवा कसे हा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधीन होता. या प्रश्नावर सम्यक विचार करुन शासन आता असे आदेश देत आहे की, वर्ग-३ मधून वर्ग-३ मधील वरिष्ठ पदांवर, वर्ग-२ मधून वर्ग-२ मधील वरिष्ठ पदांवर आणि वर्ग-१ मधील दुसऱ्या पदोन्नतीपर्यन्तच्या पदांवर पदोन्नती करतानाही निम्न पदावर ३ वर्षाच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून विहित करण्यात यावी. तसेच आंतरश्रेणीय पदोन्नतीसाठी निकटतम निम्न पदावर ३ वर्षाच्या किमान सेवेची अट विहित करण्यात यावी.

२. मंत्रालयाच्या विविध विभागांनी आपापल्या कक्षेतील पदांच्या संदर्भात वरील तत्व संबंधित सेवाप्रवेश नियमांत अंतर्भूत करण्याची कार्यवाही करावी आणि अशाप्रकारे कार्यवाही पूर्ण होईपर्यन्तच्या कालावधीत पदोन्नती करताना या तत्वाचा अवलंब करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ म. स. मोकाशी ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
मंत्रालयाचे सर्व विभाग,
मंत्रालयाच्या विविध विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख.